**सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना - सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR Based Stream) या योजनेसाठी सर्वसाधारण / अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती प्रवर्गाचा ₹११४०८.३४ लाख इतका निधी वितरित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: राकृवि-०४२६/प्र.क्र.५०(१६५०७२३)/१४-अे**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २२ मे, २०२६

**संदर्भ :-**

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६.
२. कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे क्र.१-१५/२०२६-RKVY-१९८, दिनांक २२.०४.२०२६
३. कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे क्र.१-१५/२०२६-RKVY-२११, दिनांक २७.०४.२०२६
४. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२९/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२५.
५. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र: राकृवि-०४२६/प्र.क्र.५०/१४-अे, दिनांक १३.०५.२०२६.
६. आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/कार्यासन-६, दिनांक १३.०५.२०२६.
७. सामाजिक न्याय विभाग, शासन परिपत्रक क्र.बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दिनांक १९.०५.२०२६

**प्रस्तावना:-**

प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना ही योजना केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे ६०:४० या प्रमाणातील अर्थसहाय्याने राबविण्यात येते. संदर्भ क्र.२ येथील नमूद पत्राद्वारे केंद्र शासनाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये ही योजना राबविण्यासाठी एकूण ₹२६१६१.५५ लाख एवढ्या वार्षिक कृती आराखड्यास मंजूरी दिली आहे. त्यानुषंगाने संदर्भ क्र.५ येथील दिनांक १३.०५.२०२६ च्या शासन निर्णयान्वये सन २०२६-२७ करीता प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR Based Stream) या योजनेस ₹२६१६१.५५ लाख इतक्या रक्कमेस प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

०२. केंद्र शासनाने संदर्भ क्र.३ अन्वये, प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR Based Stream) घटाकास मातृ मंजूरी (Mother Sacntion) दिली असून, त्याद्वारे सर्वसाधारण प्रवर्गाकरिता केंद्र हिस्सा ₹५३९४.०० लाख, अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता केंद्र हिस्सा ₹८०८.०० लाख व अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता केंद्र हिस्सा ₹६४३.०० लाख असा एकत्रित एकूण ₹६८४५.०० लाख इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यानुषंगाने या योजनेसाठी केंद्र हिस्सा व त्यास समरुप राज्य हिश्याचा निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

०१. प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR Based Stream) योजनेकरिता सन २०२६-२७ करिता प्रवर्गनिहाय केंद्र शासनाचा हिस्सा (६०%) ₹६८४५.०० लाख (सर्वसाधारण प्रवर्गास ₹५३९४.०० लाख, अनुसूचित जाती प्रवर्गास ₹८०८.०० लाख व अनुसूचित जमाती प्रवर्गास ₹६४३.०० लाख) इतका निधी व त्याच्या समरुप राज्य हिस्सा (४०%) ₹४५६३.३३ लाख (सर्वसाधारण प्रवर्गास ₹३५९६.०० लाख, अनुसूचित जाती प्रवर्गास ₹५३८.६७ लाख व अनुसूचित जमाती प्रवर्गास ₹४२८.६७ लाख) असा एकत्रित एकूण ₹११४०८.३४ लाख (रुपये एकशे चौदा कोटी आठ लाख चौतीस हजार फक्त) इतका निधी आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निधीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

**(₹ लाखात)**

| प्रवर्ग | केंद्र हिस्सा (६०%) | राज्य हिस्सा (४०%) | एकूण |
|---|---|---|---|
| सर्वसाधारण | ५३९४.०० | ३५९६.०० | **८९९०.००** |
| अनुसूचित जाती | ८०८.०० | ५३८.६७ | **१३४६.६७** |
| अनुसूचित जमाती | ६४३.०० | ४२८.६७ | **१०७१.६७** |
| **एकूण...** | **६८४५.००** | **४५६३.३४** | **११४०८.३४** |

०२. उपरोक्तनुसार प्रवर्गनिहाय वितरित निधी केंद्र हिस्सा व राज्य हिश्याच्या पुढील लेखाशिर्षांतर्गत सन २०२६-२७ मध्ये अर्थसंकल्पित केलेल्या तरतुदींतून खर्च करण्यात यावा.

| **सर्वसाधारण प्रवर्ग** | |
|---|---|
| **केंद्र हिस्सा** | **राज्य हिस्सा** |
| मागणी क्र. डी-३<br>२४०१ पीक संवर्धन<br>(००) (८००) इतर खर्च<br>(००) (०९) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत अर्थसहाय्य (कें.पु.यो.) (केंद्र हिस्सा ६० टक्के) (कार्यक्रम)<br>(२४०१ ८२३५) ३३ - अर्थसहाय्य | मागणी क्र. डी-३<br>२४०१ पीक संवर्धन<br>(००) (८००) इतर खर्च<br>(००) (११) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत अर्थसहाय्य (कें.पु.यो.) (राज्य हिस्सा ४० टक्के) (कार्यक्रम)<br>(२४०१ A२२५) ३३ - अर्थसहाय्य |

<table>
<tr><td colspan="2">अनुसूचित जाती प्रवर्ग</td></tr>
<tr><th>केंद्र हिस्सा</th><th>राज्य हिस्सा</th></tr>
<tr><td>मागणी क्र. एन-३<br>२४०१ पीक संवर्धन<br>(००) (७८९) अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना<br>(०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना<br>(०१) (१५) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजनांतर्गत अर्थसहाय्य<br>(केंद्र हिस्सा ६०%) (कार्यक्रम)<br>(२४०१ B२२१), ३३- अर्थसहाय्य</td><td>मागणी क्र. एन-३<br>२४०१ पीक संवर्धन<br>(००) (७८९) अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना<br>(०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना<br>(०१) (१६) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य<br>(राज्य हिस्सा ४०%) (कार्यक्रम)<br>(२४०१ B२३२), ३३- अर्थसहाय्य</td></tr>
<tr><td colspan="2">अनुसूचित जमाती प्रवर्ग</td></tr>
<tr><th>केंद्र हिस्सा</th><th>राज्य हिस्सा</th></tr>
<tr><td>मागणी क्र. टी-५<br>२४०१ पीक संवर्धन<br>(००) (७९६) जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) (३२) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत अर्थसहाय्य<br>(केंद्र हिस्सा ६० टक्के) (कार्यक्रम)<br>(२४०१ A७४४), ३३-अर्थसहाय्य</td><td>मागणी क्र. टी-५<br>२४०१ पीक संवर्धन<br>(००) (७९६) जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) जनजाती क्षेत्र उपयोजना<br>(०१) (३३) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य<br>(राज्य हिस्सा ४० टक्के) (कार्यक्रम)<br>(२४०१ A७५३), ३३-अर्थसहाय्य</td></tr>
</table>

०३. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीचे वितरण करण्याकरिता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना नियंत्रण अधिकारी व सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०४. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला निधी खर्च करताना प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR Based Stream) या योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे, तसेच, संदर्भ क्र. ३ येथे नमूद केंद्र शासनाच्या दिनांक २७.०४.२०२५ रोजीचा पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

०५. लाभार्थ्यांना अनुदान वाटप करताना शासनाद्वारे वेळोवेळी विहीत केल्या जाणाऱ्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करण्यात यावा. सदर योजनेच्या लाभार्थ्यांची निवड महा-डीबीटी प्रणालीद्वारे करण्यात यावी व लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप आधार संलग्न बँक खात्यावर जमा करावा.

०६. सदर निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास पाठवून त्याची प्रत राज्य शासनास पाठवावी.

०७. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६, आदिवासी विकास विभागाचे शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२६/ प्र.क्र.६१/ कार्यासन-६, दिनांक १३.०५.२०२६ आणि सामाजिक न्याय विभागाचे शासन परिपत्रक क्र.बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दिनांक १९.०५.२०२६ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०५२२१०५००७९४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GANPAT SANDIPAN KACHARE

Digitally signed by GANPAT SANDIPAN KACHARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf dept, 2.5.4.20=3021BF955FEFD71FFAD5DD7C97769147F19ACA6383A12FED6CFF4849D78E224A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B5B30AEBA818C77E43E7B8BA4BCA0E9F0D137FEAB0BBCB16CACF2D44087E8A76, cn=GANPAT SANDIPAN KACHARE
Date: 2026.05.22 10:51:01 +05'30'

**(ग.सं.कचरे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ विभाग), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता विधानसभा/ विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
८) सर्व मा. संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य /महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
९) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव (सहकार व पणन) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) सचिव (पशुसंवर्धन) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
१७) महालेखापाल महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
१८) महालेखापाल महाराष्ट्र (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.
१९) वित्त विभाग (व्यय- १/अर्थसंकल्प १३), मंत्रालय, मुंबई.
२०) नियोजन विभाग (का-१४३१), मंत्रालय, मुंबई.
२१) सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२२) निवडनस्ती (१४-अे कार्यासन) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.